# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/08/2023 (बुधवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र. ०१ बुट्टीबोरी येथे दिनांक १४/०८/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक १५/०८/२०२३ चे ५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मोहसिन रशीद खान पठाण, वय ३८ वर्षे, रा. पठाण ले आऊट, वार्ड क्र. ०१ बुट्टीबोरी हे घराचे दरवाज्याला गेटला कुलुप लावुन उर्स पाहण्यासाठी नागपूरला गेले असता घरी परत येवून पाहणी केली असता घराच्या गेटला व दरवाज्याला कुलुप लागुन दिसले नाही. गेट व दरवाजा दोन्ही उघडे होते. फिर्यादीने घराचे आत जावुन पाहणी केली असता स्वयंपाक घरात ठेवलेल्या लोखंडी कपाट उघडे दिसले. यावरून फिर्यादीने त्यांच्या पत्नीला फोन करून विचारणा केली असता तिने सांगितले की, कपाटाला लॉक केलेले नव्हते. कपाटात १) सोन्याचे मंगळसुत्र ०३ ग्रॅम किंमती ९०००/— रू., २) सोन्याची अंगठी ०३ ग्रॅम किंमती ९०००/— रू., ३) सोन्याचे कानातले ०३ ग्रॅम किंमती ९०००/— रू. ४) लहान मुलांचे चांदीचे कडे ०२ नग, कंबरपट्टा ०१ नग, पायपट्ट्या ०२ जोडी, चांदीची अंगठी किंमती २०००/— रू. ५) नगदी रक्कम ३०००/— रू. ठेवलेले होते. यावरून फिर्यादीने कपाटाची पाहणी केली असता वर नमुद सोन्या—चांदीचे दागीने एकुण किंमती २९०००/— व नगदी असा एकुण ३२०००/— रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराच्या गेटचे व दरवाज्याचे कुलुप तोडून घराचे आत प्रवेश करून घरात ठेवलेल्या कपाटातुन वर नमुदप्रमाणे सोन्या—चांदीचे दागिने बिलासह व नगदी रक्कम एकुण ३२०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशी/१७४ युनुस खान मो. नं. ९८५०२७८९०० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा बोरी घिवारी येथे दिनांक १४/०८/२०२३ चे ०५.०० वा. ते दिनांक १५/०८/२०२३ चे ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुशांत उदलसिंग गहेरवाल, रा. इंदोरा ता. मौदा जि. नागपुर यांची शेती बोरी शिवारात आहे. दिनांक १४/०८/२०२३ रोजी सायंकाळी ५/०० वा. शेतीला पाणी देवुन मोटार बंद करून फिर्यादी आपल्या घरी परत आला व दिनांक १५/०८/२०२३ रोजीचे सकाळी ८/०० वा. चे दरम्यान आपल्या शेतातील मोटार सुरू करण्याकरीता गेला असता तेव्हा बोरी घिवारी शिवारात फिर्यादीचे शेतात कृत्रीम तलावात लावलेली पाण्याची मोटार एच पी टाटा कंपनीची समससिबल मोटार किंमती अंदाजे ७०००/— रू व दोरी आणि वायर तसेच पाइप कापुन कोणीतरी अज्ञात चोराने नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक बघमारे मो. नं. ९८६०३५३१७९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर